सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २० जानेवारी २०२१

**गडचिरोलीतील ग्रामपंचायतींसाठी**
**सरासरी ६७ टक्के मतदान**

मुंबई, दि. २० (रा.नि.आ.): गडचिरोली जिल्ह्यातील १५० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांत प्राथमिक अंदाजानुसार सरासरी ६७ टक्के मतदान झाले, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज येथे दिली.

श्री. मदान यांनी सांगितले की, गडचिरोली जिल्ह्यातील सुमारे ३६० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा १६ डिसेंबर २०२० रोजी करण्यात आली होती. यातील काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका पूर्णत: तर काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका अंशत: बिनविरोध झाल्या. त्यामुळे प्रत्यक्षात १७० ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२१ रोजी; तर १५० ग्रामपंचायतींसाठी आज (ता. २०) मतदान झाले. सकाळी ७.३० पासून ते दुपारी ३.०० पर्यंतच मतदानाची वेळ होती. या सर्व ग्रामपंचायतींसाठी मतमोजणी २२ जानेवारी २०२१ रोजी पार पडणार आहे.

0-0-0

(Jagdish More, SEC)